# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि संशोधन केंद्र, अचलपूर

दुरध्वनी क्र. ०७२२३/२२०११ E-mail - arsachalpur@gmail.com


जा.क्र. कृसंके/अचल/प्रक्षेत्र/ ९० /२०२६ दिनांक २८/०५ /२०२६

निविदा सुचना

प्रति,

.................................

.................................

.................................

विषय - प्रक्षेत्रावरील खालिल नमूद केलेल्या तक्त्यातील कामाचे निविदा दर पुरविणेबाबत.

| अ.क्र. | प्रक्षेत्रावरील कामाचा तपशिल | दर | अंदाजे काम |
|---|---|---|---|
| १ | प्रक्षेत्रावरील १ मीटर काटेरी फास लावणे (तीन काटया बाहेरुन, मध्ये दोन पोटभरण व आतून दोन अशा एकुण कमीत कमी सात काटया भक्कम भरुन देणे.) | | |

निविदा पत्रकाविषयी नियम व अटी व शर्ती -

१. दर पत्रके सोबत दिलेल्या नमुन्यात मोहरबंद लिफाफयामध्ये दिनांक ०९/०६/२०२६ पर्यंत (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) सादर करावीत.

२. लिफाफ्याच्या डाव्या बाजुस स्पष्ट अक्षरात निविदा सुचना मध्ये नमुद केलेला विषय नमुद करावा तसेच दर पत्रकामध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्रक्र.कृसंके/अचल/प्रक्षेत्र/९० /२०२६ व दिनांक २८/०५ /२०२६ नमुद करावे.

३. काम करणा-या मजुरांच्या कायदेशिर दायित्वाची इत्यादीची जबावदारी संबंधित निविदा धारकाची असेल कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, झाडावरुन पडणे व शेतीस अनुसरुन इतर इजा इत्यादीबाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही/स्विकारणार नाही.

४. काम अपुर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५. समान दरपत्रके व दर आढळून आल्यास यापूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व याबाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.

६. कोणतीही निविदा पुर्णपणे अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रके नाकारणे यांचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समिती यांचे असतील.

७. संबंधित दर हे संपूर्ण वर्षासाठी स्थापित असतील.

८. प्रक्षेत्रावरील उपलब्ध काटेरी झुडपे, काटया गोळा करुन फास भरणे हे आपल्या स्तरावर राहील त्यात कोणत्याही मोठया काटेरी झाडाला इजा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच प्रक्षेत्रावरील वाहतूकीसाठी एक ट्रॅक्टर व ड्रायव्हर कार्यालयीन वेळेत पुरविण्यात येईल.

९. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयके अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित निविदा धारकास लागणारे देयके अदा करण्याची स्वत: जबाबदारी राहील तसेच काम करणा-याच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही. त्याबाबत कोणत्याही प्रकारचे दस्तऐवज या कार्यालयामार्फत मिळणार नाही. तसेच लागणारी निविष्ठा कार्यालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर कामाबाबत रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरीकडे करारनामा करुन देण्यात दयावा लागेल. रु. १००/- चा स्टॅम्प निविदाधारकास आणावा लागेल.

१०. दर पत्रके मंजुर करणे अथवा काम समाधानकारक न केल्यास सदर करार रद्द करणे याबाबतचे सर्व हक्क समितीने स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

११. या प्रक्षेत्रावरील निविष्ठा व इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाहीत.

१२. या दर प्रक्रीयेत अथवा कामाच्या बाबतीत न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अचलपूर न्यायालयात चालेल.

१३. संबंधित निविदाधारकांनी वरील नियम व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सही, नाव व पुर्ण पत्त्यासह व मोबाईल नंबर सह दरपत्रक सोबत सादर करावेत.

१४. निविदा कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १० ते ५ पर्यंत स्विकारल्या जातील.

१५. कामाचा आदेश प्राप्त झाल्यापासून ३ दिवसात काम सुरु करावे लागेल.

१६. काम झाल्यानंतर उधारी देयक दोन प्रतिमध्ये देण्यात यावे.

प्रभारी अधिकारी,
कृषि संशोधन केंद्र, अचलपूर